महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक ३७४(२)/विद्युत/२०२२/१९ दिनांकः- ११ ऑगस्ट, २०२३

## प्रसिध्दीपत्रक

**विषय :- महाराष्ट्र विद्युत व यांत्रिकी अभियांत्रिकी सेवा (मुख्य) परीक्षा-२०२२ सर्वसाधारण गुणवत्ता यादीबाबत**

**संदर्भ :-पूर्व परीक्षा जाहिरात क्रमांक ०८७/२०२२, दिनांक ३० सप्टेंबर, २०२२ व मुख्य परीक्षा अधिसूचना क्रमांक ०१४/२०२३ दिनांक २ मार्च, २०२३.**

महाराष्ट्र विद्युत व यांत्रिकी अभियांत्रिकी सेवा (मुख्य) परीक्षा-२०२२ या परीक्षेत अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांच्या मुलाखती दिनांक १ ते ४ ऑगस्ट, २०२३ आणि दिनांक ८ ते ११ ऑगस्ट, २०२३ या कालावधीत आयोगाच्या सीबीडी बेलापूर, नवी मुंबई येथील कार्यालयात घेण्यात आल्या होत्या. तद्अनुषंगाने संबंधित उमेदवारांची सर्वसाधारण गुणवत्ता यादी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

२. प्रस्तुत परीक्षेची सदर सर्वसाधारण गुणवत्ता यादी निव्वळ तात्पुरत्या स्वरूपाची आहे. अर्जामधील विविध दाव्यांच्या अनुषंगाने अंतिम निकालापूर्वी प्रमाणपत्रे / कागदपत्रे पडताळणी करताना काही उमेदवारांच्या दाव्यांमध्ये बदल होऊ शकतो व पर्यायाने उमेदवाराचा गुणवत्ता क्रम बदलू शकतो, उमेदवार अपात्र ठरू शकतो.

३. प्रस्तुत सर्वसाधारण गुणवत्ता यादी विविध मा. न्यायालयात / मा. न्यायाधिकरणात दाखल करण्यात आलेल्या न्यायिक प्रकरणांवरील अंतिम न्यायनिर्णयाच्या अधीन राहून जाहीर करण्यात आली आहे.

४. आवश्यक तपासणीनंतर तात्पुरती शिफारस यादी प्रसिध्द करण्यात येईल व त्यावेळी उमेदवारांना भरती प्रक्रियेतून बाहेर पडण्याचा विकल्प उपलब्ध करुन देण्यात येईल. सदर पर्याय निवडणाऱ्या उमेदवारांची नावे शिफारसीकरीता विचारात घेतली जाणार नाहीत, अशा उमेदवारांची नावे शिफारसीकरीता विचारात न घेता अंतिम गुणवत्ता यादी व अंतिम शिफारस यादी प्रसिध्द करण्यात येईल.

ठिकाण :- नवी मुंबई

उपसचिव (परीक्षोत्तर-राजपत्रित)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.